## प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतूक/१०८९८/२०१६ पुणे शहर, दिनांक - २२.१२.२०१६.

**विषय :- मा.पंतप्रधान भारत सरकार हे पुणे भेटीवर येणार आहेत त्या दरम्यान पर्यायी रस्त्यांचा वापर व पार्कींग बाबत.**

----------oo----------

दिनांक २४.१२.२०१६ रोजी,सायंकाळी १८.०० ते २०.०० वा. मा.पंतप्रधान भारत सरकार हे पुणे भेटीवर येणार आहेत. त्यावेळी टेक्नीकल एअरपोर्ट ते कृषी महाविद्यालय मैदान, शिवाजीनगर पुणे या मार्गाचा वापर करणा-या सर्व वाहनचालकांनी/नागरीकांनी आपली गैरसोय टाळण्याकरीता वरील नमुद वेळे पुरता सदर रस्त्याचा वापर टाळून इच्छितस्थळी जाण्याकरीता इतर पर्यायी मार्गाचा वापर करावा.

कृषी महाविद्यालय,शिवाजीनगर पुणे आवारात मुख्य प्रवेशद्वारातून व्ही.व्ही.आय.पी.वाहनां व्यतिरीक्त सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

कृपया नागरिकांनी सुरक्षेततेच्या कारणास्तव किमान २ तास अगोदर म्हणजेच सायंकाळी १६.०० वाजता येऊन स्थानापन्न व्हावे.

तसेच येताना कोणतीही बॅग,पिशवी,पाण्याची बाटली इत्यादी साहित्य आणू नये याबाबत नागरिकांनी सहकार्य करावे.

कृषी महाविद्यालय,शिवाजीनगर पुणे येथील कार्यक्रमस्थळी जाणा-या वाहन चालकांसाठी खालीलप्रमाणे वाहन पार्कींगची व्यवस्था केलेली आहे.

### पार्किंग बाबत -

१.सिमला ऑफीस चौकाकडून येणा-या वाहनचालकांनी आपली वाहने पार्क करण्यासाठी सिमला ऑफीस ते रेंजहिल कॉर्नर येथे जाऊन उजव्या वाजूने सिंचननगर येथे जाऊन आपली वाहने पार्क करावीत.

२.फर्ग्युसन रोडवरुन येणा-या वाहनचालकांनी आपली वाहने पार्क करण्यासाठी सिमला ऑफीस ते रेंजहिल कॉर्नर येथे जाऊन उजव्या वाजूने सिंचननगर येथे जाऊन आपली वाहने पार्क करावीत.

३.पाषाणरोड,बाणेररोड व औंधरोड येथून येणा-या वाहनचालकांनी रेंजहिल कॉर्नर येथून डावे बाजूने जाऊन सिंचननगर येथे आपली वाहने पार्क करावीत.

४.आर.टी.ओ.संगमवाडी व संचेतीकडून येणा-या वाहनचालकांनी पोल्ट्री फॉर्म चौक येथून डाव्या बाजूने जाऊन सिंचननगर येथे आपली वाहने पार्क करावीत.

५.होळकर ब्रीज येथून येणा-या वाहनचालकांनी पोल्ट्री फॉर्म चौकातून सरळ जाऊन सिंचननगर येथे आपली वाहने पार्क करावीत.

६.जुना मुंबई रोडने निगडी व भोसरी कडून येणा-या वाहनचालकांनी शासकीय दुधडेअरी येथून यू टर्न घेऊन पोल्ट्री फॉर्म चौक येथून डाव्या बाजूने जाऊन सिंचननगर येथे आपली वाहने पार्क करावीत.

## क. पार्कींगची ठिकाणे-

१. निमंत्रितांकरीता पार्कींग(व्ही.व्ही.आय पी पार्कींग)- कार्यक्रमाच्या ठिकाणी स्टेजच्या पाठीमागे आळंबी प्रोडक्शन (मशरुम ग्राऊंड) प्रवेश कृषी महाविद्यालय मुख्यप्रवेशद्वार

२. व्ही.आय.पी.पार्कींग- कार्यक्रमाचे ठिकाणी गेट नं.- १, २, ३, ४ व क्राईम युनिट क्र.३ चे शेजारी मोकळ्या जागेत. प्रवेश- रेंजहिल कॉर्नर व पोल्ट्री फार्म चौक

३. मोटार सायकल पार्कींग – सिंचननगर फाट्याचे जवळ भोसलेनगर येथील मोकळ्या जागेत

४. पार्कींग क्र.१- रेंजहिल कॉर्नर चौक रस्त्याचे पलिकडे मोकळ्या जागेत सर्वांसाठी पार्किंग.

५. पार्किंग क्रमांक- २ केद्रीय विद्यालय, रेंजहिल्सच्या शेजारील मोकळ्या जागेत,सर्वांसाठी पार्कींग-येण्याचा मार्ग जुना मुंबई-पुणे रोडवरील चर्च चौक,खडकी पोलीस स्टेशन येथून.

६. पार्किंग क्रमांक- ३ शिवरकर बंगल्याचे उजव्या बाजूस मोकळ्या मैदानात रेंजहिल्स येथे सर्वांसाठी पार्कींग- येण्याचा मार्ग जुना मुंबई-पुणे रोडवरील चर्च चौक,खडकी पोलीस स्टेशन येथून.

७. पार्किंग क्रमांक-४ पोल्ट्री फार्म चौक येथील के.सी.बी.च्या मोकळ्या जागेत सर्वांसाठी पार्किंग.

दिनांक- २४/१२/२०१६ रोजी सायं.१६.०० ते २०.०० वा. पर्यंत पोल्ट्री फार्म चौक ते रेंजहिल कॉर्नर चौक दरम्यानचा रस्ता सर्व वाहनांसाठी बंद राहणार आहे.

तरी सर्व नागरिकांनी वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक शाखा, पुणे शहर यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.